

# जंगलसफारी
# बांधवगड

प्रा. आरती खोपकर

# जंगल सफारी : बांधवगड

प्रा. आरती खोपकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# जंगल सफारी : बांधवगड

## लेखिका : प्रा. आरती खोपकर

ई मेल : arati.aval@gmail.com
दूरध्वनी : 9890971443
ई – ३४, स्वप्नशिल्प, कोथरूड, पुणे २९

## प्रकाशचित्र : प्रा. आरती खोपकर

या पुस्तकातील लेखनाचे व फ़ोटोंचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे, चित्रांचे किंवा त्यातील अंशांचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## प्रकाशक : ई-साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2015

प्रकाशन : ९ ऑगस्ट २०१५

# आरती खोपकर



मायबोली या वेबसाईटने अनेक मराठी लोकांच्या आतल्या सुप्त लेखकाला जागे केले. ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे ई पुस्तकरुपाने भेटीला आलेल्या कविता नवरे, नचिकेत जोशी, भारती बिर्जे, विशाल रणदिवे, प्रियांका जोशी वगैरे लेखकांच्या यादीत आता अजून एक मायबोलीकर सादर करीत आहोत, प्रा. आरती खोपकर.

प्रा. आरती चारुहास खोपकर या व्यवसायाने इतिहासाच्या प्राध्यापिका आहेत. इतिहास या विषयावर त्यांनी विपुल लेखन केले असून "कवडसे" हे त्यांचे इतिहासावरील लेखांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्याशिवाय त्यांचा "गोष्ट माणसाची" हा इतिहासलेखनाबद्दलचा ब्लॉग आहेच. त्या ब्लॉगवर "कवडसे" हे पुस्तकही वाचनासाठी उपलब्ध आहे. (http://goshtamanasachi.blogspot.in/).

इतिहासाव्यतिरिक्त इतरही अनेक विषयांत त्यांना ॲक्टिव्ह रस आहे. उदाहरणार्थ लेखन, वाचन, विणकाम, भरतकाम, पाककला, चित्रकला, ॲनिमेशन, फोटोग्राफी, संगीत अशा विविध कलांमध्ये त्यांना रस आणि गती आहे. त्यांनी ॲनिमेशनचे रितसर शिक्षण घेतले आहे. या प्रत्येक विषयावर त्यांचा एक एक स्वतंत्र ब्लॉग आहे. आणि या सर्व ब्लॉग्सचा एक http://arati-aval.blogspot.in हा मास्टरब्लॉग आहे. इथून तुम्ही त्यांचे सर्व ब्लॉग भटकू शकता.

हो, तर भटकणे हा त्यांचा मुख्य विषय. त्यातही जंगलं. किंवा असे प्रदेश जिथे फ़क्त हटके भटके जातात. त्यामुळे ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े त्यांच्या या जंगल भटकंतीची सिरीजच सुरू होत आहे. आरतीजींचा जंगल सफ़ारीची गोष्ट रंगवून सांगण्यात हातखंडा आहे. आणि त्यांची ती गोष्ट वाचून संपल्यावर आपण जेव्हा भानावर येतो तेव्हा कळतं की “अरे आपण तर आपल्या घरातच आहोत!”. आम्हाला तरी असं गुंगवून टाकलं या पुस्तकाने. तुम्हाला हे पुस्तक कसं वाटलं ते arati.aval@gmail.com या त्यांच्या पत्त्यावर नक्की कळवा आणि त्यांच्या पुढील पुस्तकांच्या ई प्रती मिळवा.

सुनिल सामंत
टीम ई साहित्य

# मनोगत

माझ्या अनेक प्रेमांपैकी एक, जंगल प्रेम. जंगल, मग त्यातले वृक्ष, वल्लरी, पक्षी, प्राणी, ओहोळ, माती, अगदी तिथला वासही मला भारून टाकतो. त्याच प्रेमापोटी कान्हा, बांधवगड, रणथंबोर अशी जंगल भटकंती केली. त्यातलेच हे एक, जंगल सफारी : बांधवगड.

अनेक लोक जंगल बघण्यापेक्षा फक्त वाघच बघायला जातात. पण फक्त वाघ म्हणजे जंगल नव्हे. तो सारा अनुभव घेणं हाच एक सोहळा. निसर्गाच्या सान्निध्यात असणं, तिथला शांतपणा अनुभवणं, निसर्गातली विविधता टिपणं, प्राण्यापक्षांचे आवाज ऐकणे, त्यांचा संवाद समजून घेणे, हे सगळेच किती वेगळे, किती आनंदाचे. आमच्या बांधवगड जंगल सफारीत जोडीने व्याघ्रदर्शनही भरपूर झाले. हा सगळा अनुभव शब्दांत अन प्रकाशचित्रात पकडण्याचा हा माझा प्रयत्न.

बांधवगडला जाऊन आल्यानंतर तिथले फोटो मी मायबोली (maayboli.com) इथे टाकले. तेथील रसिकांनी त्याचे कौतुक केले. त्यामुळे त्या संपूर्ण अनुभवाबद्दल काही लिहिले अन तेही मायबोलीवर टाकले. तिथल्या अनेक रसिक मित्रमैत्रिणींना खूप आवडले ते लिखाण. अन मग या सर्व लिखाणाची तिथे लेखमालिका झाली. या लिखाणाचे पहिले वाचक मायबोलीवरील सर्व रसिक ! त्यांनाच हे माझे पुस्तक समर्पित ! अशा मित्रमैत्रिणींमुळेच मी माझे चार शब्द लिहित गेले, मनापासून आभार मायबोली आणि मायबोलीकर :-)

माझे हे लिखाण ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित करायचे मान्य केल्यामुळे आता हे लेखन, ई पुस्तक रुपामधे रसिकांपर्यंत पोहचत आहे. ई-साहित्य टीम आणि सुनिल सामंत यांचे मी मनापासून आभार मानते. ई साहित्याची एक नवी चळवळ त्यांनी उभी केली आहे, माझा त्यात हा खारीचा वाटा.

बांधवगडची सफर इतकी छान होण्यात महत्वाची भूमिका होती, ती फोलिएज या कंपनीची. (http://www.infinitejourneys.in/foliage-outdoors/

+91 - 20 – 66447777) त्यांची अतिशय आखीव रेखीव, पूर्णतयारीची अशी ही सफर. त्यांचेही विशेष आभार. फोलिएजच्या सर्व सहकाऱ्यांचेही आभार.

माझे पती श्री. चारुहास आणि मुलगा निखिल या दोघांमुळे ही सफर अजूनच आनंददायी झाली. माझे खूप वर्षांचे स्वप्न, मोठा कॅमेरा घेणे हेही त्या दोघांमुळेच शक्य झाले. निखिलने आग्रह धरला म्हणूनच इतका मोठा कॅमेरा मी घेतला

सर्वात शेवटी आपणा सर्व रसिक वाचकांचेही आभार, तुम्ही सर्व वाचता म्हणून काही लिहिण्याचा उत्साह वाढतो. तुमच्याकडून प्रतिसाद मिळाल्यावर रणथंबोर, ताडोबा, कान्हा यांच्यावरही लिहीन म्हणते. हे पुस्तक वाचल्यावर तुमच्यातील काही जणांनी जरी जंगल सफारी केली, जंगलाचा अनुभव घेतलात, तरी या पुस्तकाचे चिज झाले असे म्हणेन.

खरोखर, प्रत्येकानं एकदा तरी अनुभवावं जंगल ___/___

-

प्रा.सौ.आरती खोपकर (अवल)

ई मेल : arati.aval@gmail.com
दूरध्वनी : 9890971443

# अनुक्रमणिका


१. पूर्वानुभव

२. बांधवगडची पहिली संध्याकाळ

३. दुसऱ्या दिवशी सकाळीच "कथा सफल-संपूर्ण"

४. टायगर शो !

५. दुसरी संध्याकाळ

६. कल्लू आणि बल्लू

७. जंगलातला थींकर आणि थरार

८. "बी टू" ला शेवटचा मुजरा

# १. पूर्वानुभव : आमचे अनोखे बेबीसिटिंग

लेकाची दहावी संपली आणि हुश्य झालं. दहावीची मांडवपरतणी म्हणून आम्ही बांधवगडचा बेत केला. मागे 'फोलिएज' बरोबरचा कान्हाचा अनुभव फार छान होता, त्यामुळे पुन्हा त्यांच्याबरोबरच जायचे नक्की केले. एकतर त्यांची सगळी सोय मस्त होती, सोबतही छान होती. पण सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्यांचा "पायगुण" मस्त होता कारण कान्हाला आम्हाला नऊ वेळा व्याघ्रदर्शन घडले होते. पहिल्यांदाच जंगलात जाऊन इतक्यांदा वाघ पहायला मिळाला होता त्यामुळे आम्ही फारच नशिबवान ठरलो होतो. त्यात त्या वेळेस गाईडच्या अनुभवामुळे एका ठिकाणी अगदी तासभर काही दिसत नसताना त्याच्यावर विश्वास ठेऊन थांबून राहिल्यावर फार मोठे घबाड मिळाले होते.

झालं काय, आम्ही एका टेकडीवरच्या वळणाच्या रस्त्यावर होतो. उजवी कडे छोटी टेकडी होती, अन डावी कडे खाली नदी होती. डावी कडे थोडे खोल असल्याने अन तिथे खुप झाडी असल्याने काहीच दिसत नव्हते. थोडे लांबवर नदीपलिकडचा चढ अन तिथली छोटी टेकडी दिसत होती. मागे साधारण दहा फुटाचा रस्ता दिसत होता अन पुढे लगेच वळण.

आम्ही जरा साशंकच होतो, इथून काय अन कोठे दिसणार? पण आपल्यापेक्षा गाईडचा जंगलचा अनुभव मोठा, या विचाराने गप्प बसलो. आर्धातास झाला पण तरी काही घडेना. बरं जंगलात बोलायला बंदी. निसर्ग बघत अन जंगलाची निरव शांतता ऐकत बसून राहिलो. मध्येच गाईडकडे काय अशी नजरने, मानेने विचारणा करत होतो. तो हळूच म्हणाला, " इधरसे बाधिन जायेगी| निचे पानी है और सामने एक गुफा जैसे दिख रहा है ना| " आम्हाला फारसे कळले नाही. पण समोरच्या टेकाडावरती थोडी गुहेसारखी जागा आता सांगितल्यावर आम्हाला दिसली. खरच मस्त गुहा होती ती !

अन मग अचानक जंगलाला जाग आली. चितळाने पहिला कॉल दिला. कॉल म्हणजे; वाघ, बिबळ्या वगैरे शिकारी प्राणी शिकारी साठी हालचाल करू लागले की इतर प्राण्यांना त्यांचा सुगावा लागतो. अन मग ते इतर प्राण्यांना सावध करण्यासाठी विशिष्ठ आवाज काढतात, त्याला कॉल असे म्हटले जाते. एरवी माकड, सांबर, चितळ ओरडताना जसा आवाज काढतात त्यापेक्षा हा कॉल देताना ते वेगळे आवाज काढतात. जसे माकडे एरवी हुप असे ओरडतात तर कॉल देताना खॉक खर असा काहीसा खोकल्यासारखा आवाज काढतात. जंगलात लक्ष देऊन एक दिवस जरी फिरलात की हे कॉल्स कळायला लागतात. अर्थात खरा कॉल कोणता, फॉल्स कॉल कोणता हे कळायला जरा वेळच लागतो. पण हे कॉल ट्रेस करायला मजा येते.

तर आता जंगल जिवंत झाले. आमच्या मागच्या बाजूने चितळाने कॉल दिला. आमच्यात लगेच चैतन्य आले. लगेचच माकडाने खॉक केले. जंगल भराभर हालू लागले. गाईडने कानोसा घेउन जीप चालकाला जीप हळूहळू मागे घे असे सांगितले. " बच्चेवाली आ रही है| " आम्ही थक्कच ! चक्क वाघिण अन तिची पिल्ले एकत्र ? एकदम गाईड म्हणाला, " जल्दी कर "

जीप झटक्यात मागे गेली. पण जSSSSSरा उशीर झाला. आम्ही चकीत होऊन बघत राहिलो. मगाशी येताना आमच्या जीपच्या टायरचे ठसे होते त्यावर आता वाघिणीच्या पावलांचे ठसे होते. " बच्चेवाली यहाँसे अभी निचे गयी " आम्ही ते ठसे पाहून मंत्र मुग्ध झालो., इतके की त्याचे फोटोही काढायचे विसरलो.

" अरे आगे ले, जहाँ पर खडे थे" गाईडने जीपचालकाला ऑर्डर दिली . आता आम्ही त्याच्या माहिती, अनुभव अन ज्ञानावर पूर्ण विश्वास ठेवला. तरी मनात खुटखुटत होते, बच्चे वाली? पण पिल्लांचे ठसे तर नव्हते.....

" वो देखो, सामने देखो, ऊस गुफाँ के सामने देखो...." आता गाईडही उतावळा झाला होता. आम्ही समोर बघितलं. तसं जवळ जवळ ४० एक फूट अंतर होतं. आम्ही गाईड दाखवत होता तिथे प्राण डोळयात आणून पहात होतो. आम्हाला तिथल्या झुडुपांमध्ये हालचाल दिसली. अन अहो आश्चर्य तिथे दोन अगदी छोटी पिल्लं खेळत होती. अजून काळी-पांढरीच होती, एक क्षण मला ती मांजराची पिल्लंच वाटली, इतकी छोटी

होती ती ! अन तेव्हढ्यात एक मोठा वाघ गुहेतून बाहेर आला. " वो देखो बडा बेटा आ गया | " आम्ही थक्क झालो. म्हणजे ही वाघिण नव्हती, तिचा मोठा मुलगा, छोट्या भावंडांना सांभाळत गुहेत बसला होता, अन आई आल्यावर हे सगळे कुटुंब बाहेर खेळायला आले होते, आईच्या छत्रा खाली सुरक्षित वाटल्याबरोबर! वाघिण मात्र दिसत नव्हती. कारण ती खाली दोन टेकड्यांच्या खालच्या घळीत होती. आता पिल्लं अन त्यांचा दादा थोडे अजून खाली उतरले. आता ते आम्हाला दिसत नव्हते. पण त्यांचे म्यॉव म्यॉव अन गुर्गुर ऐकू येत होते. फारच मजा वाटत होती.

तेव्हढ्यात आमच्या पुढून आता कॉल देणे सुरु झाले. वाघिण तिथे न थांबता पुढे निघाली होती. गाईडने विचारले, इथेच थांबायचे का? खरं तर पिल्लं, त्यांचा दादा दिसत नव्हते. पुढे गेलो असतो तर वाघिण दिसण्याची शक्यता होती. पण गाईड म्हणला, त्याने त्याच्या १४ वर्षांच्या जंगल अनुभवात इतकी छोटी पिल्लं पाहिली नव्हती. जेमतेम महिन्याची होती. त्यामुळे त्याला त्या पिलांना पाहण्याचा मोह सुटत नव्हता, खरं तर मोठा वाघ पाहण्याची संधी सोडून या न दिसणाऱ्या पिल्लांसाठी बसणं त्याच्या कर्तव्यात बसणारे नव्हते. वाघ दाखवा असा टुरिस्टांचा हेका असतो. असे असताना हातातला वाघ सोडणे त्याला योग्य वाटेना. पण मग आम्ही त्याला सांगितले की वाघ नाही दिसला तरी चालेल पण हा अनुभव घेउयात. तो फारच खुश झाला. अन मग जवळ जवळ २५ मिनिटं आम्ही त्या तिघांचा खेळ नुसता अनुभवत बसलो. ती २५ मिनिटं मी आयुष्यात विसरणार नाही. ते निर्व्याज्य म्यॉव

अन गुरगुर अजूनही माझ्या कानात गुंजतय. एक अविस्मरणीय प्रसंग !

मग त्यांची ही जुगलबंदी एकदम थांबली. बहुतेक आई थोडी लांब गेल्यामुळे ती शांत झाली असतील किंवा दमली असतील. आम्ही अजून दहा मिनिट वाट बघितली. पण सारं काही शांत होतं. मग तिथे न थांबता गाईडने जीप पुढे काढायला सांगितली. मनात अजूनही तेच आवाज रुणझुणत होते. साधारण पाच एक मिनिटं आमची जीप पुढे जात राहिली. सगळे जण त्या पिल्लांची भाषा ऐकून शांत झाले होते.

पण पिक्चर अभी बाकी है दोस्तो :)

गाईडही तो अनुभव मनात साठवत शांत बसला होता. अन एकदम तो उभा राहिला. एव्हाना आम्हाला त्याच्या देहबोलीवरून कळून चुकले .... वाघिण आमच्या भेटीला येतेय......समोरुन वानराने खॉक केले. अन डावीकडच्या झाडीत हालचाल दिसली. साक्षात वाघिण आपल्या मोठ्या मुलासाठी त्याचा खाऊ घेऊन येत होती. अन आम्हाला दर्शन देण्यासाठीच जणू त्या वाटेवरून परत येत होती. मधल्या पाऊण तासात शिकार करून ती परतत होती. अन तिच्या कामाच्या वेळात आम्ही तिच्या बाळांचे बेबीसिटिंग केले म्हणून ती आम्हाला भेटायला आली होती जणू ! क्षणात तिने दिशा बदलली अन झाडांमधून आपल्या गुहेकडे दिसेनाशी झाली. अक्षरशः २ मिनिटांचा खेळ ! पण डोळे निवाले अगदी. परतीच्या प्रवासात आम्ही सगळे अगदी अगदी तृप्त-तृप्त, शांत-शांत होतो.

—

## २. बांधवगडची पहिली संध्याकाळ

कान्हाचा मस्त अनुभव पाठीशी होता. त्यामुळे पोस्ट दहावी सुट्टी जंगलातच जाऊन सेलिब्रेट करायची असा माझा अन माझ्या लेकाचा बेत होता. आता पुन्हा कान्हाला जायचं की दुसरे जंगल गाठायचे हे ठरत नव्हते. लेक कान्हासाठीच अडून बसला. मग फोलिएजमध्ये गेलो. तिथे सगळयांनी बांधवगडचा सल्ला दिला. त्यांनी सांगितले की दुसरी सगळी जंगलं पहा अन मग वाटलं तर पुन्हा कान्हाला जा. हे फारच छान वाटल्याने, पुन्हा कान्हाला जायच्या बोलीवर लेकाने संमती दिली.

फोलिएज ही पुण्यातली एक पर्यटक संस्था. आम्हाला दोन्ही वेळेस त्यांचा अनुभव खुप छान. लहान मुलांचे गृप ही ते घेऊन जातात. (http://www.infinitejourneys.in/foliage-outdoors/

+91 - 20 – 66447777)

सगळया जंगलात जायचे म्हणजे पुण्याहून खुप लांबचा प्रवास करावा लागतो. बरं उन्हाळयात पाण्याच्या शोधात प्राणी असतात, अन झाडी, गवत थोडे कमी असल्याने प्राणी दिसणे सोपे जाते त्यामुळे उन्हाळयातच हा प्रवास करावा लागतो. तरच तो कारणी लागतो.

बांधवगड म्हणजे मध्यप्रदेशातले अभयारण्य ! जबलपूरपर्यंत ट्रेनने जाऊन मग जवळजवळ ६ -७ तासाचा जीपचा प्रवास. बरं ट्रेनच्या वेळाही अशा की जीपचा प्रवास म्हणजे अगदी भट्टीतून तावून सुलाखून निघणार. पण काय करणार. काही मिळवायचं तर घाम गाळावाच लागणार ना

तर आम्ही बांधवगडला पोचलो तो पर्यंत संध्याकाळ झाली होती. पण तरी ही जंगलाला सलामी द्यायला हवी म्हणून सगळे एक फेरफटका मारायला निघालो. फोलिएजचे सगळे मार्गदर्शक फारच मदतखोर अन माहिती, अगदी झाडं, पक्षी, प्राणी, किटक सगळयाची तपशीलवार माहिती देणारे. या वेळेस आमच्या बरोबर होते, देवेन्द्र, अनघा, आदित्य होते. रिसॉर्टच्या दारातच छोटेसे तळे होते, अन त्यातल्या कमळांनी आमचे स्वागत केले.



गप्पा मारत थोडे पुढे गेलो अन तेव्हड्यात कोणीतरी डावीकडे लक्ष वेधले.



जंगलचा रात्रीचा रखवालदार आमच्याकडे पहात होता. थोडे पुढे झालो अन उजवी कडे नजर गेली.

समुद्रावरचा सुर्यास्त, डोंगरावरचा सुर्यास्त पाहिला होता. पण मोकळया माळरानावरचा सुर्यास्त प्रथमच बघत होते .



अंधार होत आला ,सगळेच थकले होते अन उद्या जंगलात जायचे तर सकाळी सव्वा चारला उठायचे होते. आम्ही परत फिरलो.

जंगलात जायचं तर काही गोष्टींची माहिती हवीच.

१. सहसा जंगलात जायच्या वेळा सकाळी ६.०० ते १०.३० अन संध्याकाळी ४.३० ते ६.३० अशा असतात. त्या त्या जंगलानुसार अन ऋतुनुसार यात बदल असतात. पण असे असले तरी पहाटे सव्वापाचलाच आपल्याला

निघावे लागते. कारण जंगलाच्या पहिल्या गेटवर जीपच्या रांगा लागतात. त्यात आपली जीप पहिल्या ३-५ मध्ये असली तर चांगले पडते. जंगलात साधारणतः ३-४ रस्ते असतात. एकदा का माणसांची वर्दळ वाढली की पक्षी, प्राणी जंगलात आत आत जातात. विशेषतः अस्वलं अन पक्षी. त्यामुळे पहिल्या गेटवर आपली पहिली गाडी असेल असे पहावे. त्यासाठी आपल्या जीपमधील सहसद्स्यांशी बोलून ठेवावे. कान्हाला आमच्या याच सवयीमुळे आम्हाला पहिल्याच दिवशी अस्वल बघायला मिळाले होते

२. जंगलात जाताना आपले कपडे जंगलात सामावून जातील असे हवेत . जसे हिरवा, पिवळा, तपकिरी अन या रंगाच्याही मातकट शेड्स असतील असे पहावे. विषेशतः पक्षी निरिक्षणावेळी याचा फायदा होतो. अन कोणतीही सेंट्स, सुगंधी पावडरी ही वापरू नका, त्यानेही पक्षी, प्राणी लांब जातात. आमचे मार्गदर्शक तर आंघोळीही करू नका म्हणत.

३. सगळयात महत्वाचे म्हणजे जंगलात जायचे तर आपल्या तोंडावर आपला प्रचंड ताबा हवा. जरा जरी आवाज झाला तरी पक्षी, प्राणी लांब जातात. वाघही फार आवाज असेल तर आपली वाट बदलतो. त्यामुळे जंगलाच्या आत गेलं की आपल्या तोंडाला कुलुप लावायचं. याचा एक फायदाही होतो. आपण जंगल जास्ती चांगल अनुभवू शकतो. आपणही जंगलातले आवाज ऐकू लागतो, समजू लागतो 🙂

४. आपला गाईड आणि जीप चालक याच्यावर पूर्ण विश्वास टाकावा. ते तुम्हाला जास्तीत जास्त जंगल दिसावं

असाच प्रयत्न करत असतात. पण शेवटी वाघ दिसणं - न दिसण हा केवळ नशीबाचा भाग असतो. अनेकदा प्रवासी वाघ दाखवा, वाघ दाखवा असा लकडा लावतात. मग तेही कंटाळतात. खरं तर वाघ नुसता तिथे आहे हा अनुभवही आपल्याला वेगळी अनुभुती देऊन जातो.

---

## ३. "कथा सफल-संपूर्ण"

जंगलाची अनेक सौंदर्य असतात. जसे तिथले वनस्पती जीवन, पक्षीजीवन आणि प्राणीजीवन. अन प्रत्येक जंगलाचे या तिन्हींबाबत स्वतःचे असे वेगवेगळे व्यक्तिमत्व असते. कान्हा गवताळ रानं आणि मोठी झाडी , अनेक प्रकारचे पक्षी, हरणं, रानडुकरं, कोल्हे, आणि वाघा साठी प्रसिद्ध ! दाट झाडी, बांधवगड, गिधाडं, गरुड, हरणं, रानडुकरं, सांबर आणि वाघासाठी प्रसिद्ध ! असा हा बांधवगड !



या डोंगरावर किल्लाही आहे, पण तिथे जाण्यासाठी पूर्व परवानगी लागते. या डोंगराच्या खडकातील कपारी फार महत्वाच्या आहेत कारण इथेच गिधाडांची घरं आहेत. खडकावरचे पांढरे ओघळ त्यांच्या वस्त्यांचे द्योतक आहेत. गिधाडं हे निसर्गाचे साफसफाई कामगार ! त्यांची संख्या जास्त असणं, म्हणजे जंगलात शिकार भरपूर होते आहे याचे लक्षण. म्हणजेच निसर्गाची जैवसाखळी तेथे चांगली आहे याचेच हे द्योतक.

या बांधवगडच्या पायथ्याशी जे जंगल वसले आहे तेच आपले डेस्टिनेशन ! आम्ही पहाटे ५.१५ लाच पहिल्या गेटवर पोहोचलो. आमची चौथी जीप होती. म्हणजे आम्ही निम्मी बाजी मारली होती. बरोबर ५.४५ला आतले गेट उघडले. अन आम्ही खऱ्या जंगलात प्रवेश केला. आता तीन मुख्य रस्ते होते. आमच्या गाईडने मधला बी रूट पसंत केला. हा जंगलाच्या मध्यातून जाणारा रस्ता होता.

गाइड्ने बांधवगडची थोडी माहिती सांगितली. तिथली झाडे, प्राणी, पक्षी यांची माहिती सांगितली. आम्ही थोडे पुढे आलो. अन जीप चालकाने जीप थांबवली. गाईडने डावीकडे खूण केली. डावीकडे झुडुपांची जाळी होती. छोटे पक्षी उडताना दिसत होते. काही फांद्यांवर बसले होते. तेव्हढ्यात चालकाने जीप थोडी पुढे घेतली. अन आम्ही स्तिमित होऊन बघत राहिलो. त्या झुडूपांच्या जाळी मधून छोटी वाट दिसत होती, अन त्यापुढे एक रमणीय तळे होते. अतिशय सुंदर दृश्य समोर उभे होते. त्या तळ्याभोवती चार मोर, पाच लांडोरी अन ५-६ हरणं उभी होती. आता लिहितानाही ते दृश्य डोळ्यासमोर येतय. त्यातही

तीन मोर पूर्ण पिसारा फुलवून नाचत होते. प्रियाराधन करताना आपला पिसारा पुढे-मागे करत होते. त्याचा सSSSSळ सळळळ आवाज अंगावर रोमांच उभे करत होता. माझ्याकडच्या व्हिडिओतही त्याचा आवाज टिपला गेलाय. तळयाच्या तिन्ही बाजूंना ते तीन मोर नाचत होते. इथे बघू की तिथे की त्या तिथे अशी आमची धावपळ झाली. व्हिडिओ शूटतर अगदी अवघड झाले.

बरं ते तीन मोर एकमेकांपासून लांब असल्याने एका फ्रेममध्ये पकडता येत नव्हते. मग जसे जमेल तसे फोटो काढले अन व्हिडिओ शूट केले.



माझा लेकही बऱ्यापैकी शूट करतो त्यामुळे दोन्ही शक्य झाले. पण आमचा कॅनन ४० डी अगदीच नवीन होता आम्हाला. त्यामुळे सवय नसल्याने या फोटोत अनेक चुका सापडतील जाणकारांना. पण जंगलचा फिल येण्याइतपत बरे काढले असावेत फोटो 🙂



समोर तळ्याच्या तो नाचत होता. अन अजून एक डावी कडे. आम्हाला जीपमध्ये बसूनच फोटो काढावे लागत असल्याने फारसे हलता येत नव्हते. पण त्यामुळेच मला वाटतं मोराची एका बाजूने पोज मला पकडता आली; नाही तर फक्त समोरूनच फोटो काढण्याचा मोह झाला असता.



उजवीकडचा मोर नाचत पाठमोरा झाला (निलाजरा मेला ) अन स्नॅप मारायची संधी मी पकडली, क्षणात तो पुन्हा सामोरा झाला. पण त्या आधीच मी त्याला माझ्या फ्रेममध्ये पकडले होते

तेव्हढ्यात एक हरीण पाणी प्यायला तेथे आले. मग हरीण, मोर अन लांडोर असे तिघं मला फारच भावले.





थोडे पलिकडे एकच हरीण आपली नुकतीच आलेली शिंग न्याहाळत होते, बहुदा माझ्या लेकाच्याच वयाचे असेल, आलेली इवलीशी दाढी शोधणारे!

अन उजवी कडे हे तीन मित्र. “ये दोसती, हम नही छोडेंगे”...असंच काही गात...



कित्ती वेळ आम्ही तेथेच थांबलो. जवळ जवळ २०-२५ मिनिटं. मग आमचा गाईडच म्हणाला, " आगे चलेंगे " आम्ही जणू विसरूनच गेलो होतो की जंगलात अजूनही काही बघण्यासारखे आहे ते.

आम्ही पुढे निघालो. मनातून ते दृश्य काही हलत नव्हते. आता आम्ही बी रुट्च्या शेवटी आलो. सर्व रस्ते इथे एकत्र येतात. गेटपासून इथपर्यंत आपला रूट बदलता येत नाही पण मग येथून परत कोणत्याही मार्गाने परत फिरता येते. तिथे आम्ही सर्व थांबलो. तिथे काही दुकानं आहेत तेथे बांधून घेतलेली न्याहारी खाल्ली. चहा-पाणी झाले अन परतीच्या वाटेला लागलो. मधल्या

काळात गाईडने वाघ कोठे दिसला आहे, कोठे दिसण्याची शक्यता आहे , हे इतर गाईड अन जीप चालकांशी बोलून निश्चित केले. अन आम्ही सी रूटला लागलो.

आता ऊन जाणवू लागले होते. थोडे पोट भरले असल्याने काहीशी गुंगी चढू लागली होती. तशात पहाटे चारला उठलो होतो ना ! जंगलाची निरव शांतता, वरून पेटलेले ऊन , जीपच्या स्पीडमुळे लागणारे गरम वारे.... आमची विकेट अगदी पडायला आली होती. आता पटकन रिसॉर्टवर पोहचू असे झाले होते अन तो क्षण आला.....

चालकाने जीप रस्त्याच्या कडेला उभी केली. आम्ही आजूबाजूला पाहिले. एक क्षण काहीच वेगळे जाणवेना. अन एकदम समोरच्या झाडीत लक्कन काहीतरी हलले. झाडांच्या



मातकट फांद्या, त्यांच्या काळया सावल्या अन खालचे पिवळे गवत यांच्यात "तो" अगदी लपून गेला होता.

शिकार करून त्याचाही ब्रेकफास्ट चालला होता. तोंड खाली - वर- थोडे तिरके करत लचके तोडणे चालू होते. आमच्या पासून साधारण तीस एक फुटावर असावा. पण एकदम झाडीत असल्याने तो निवांत होता. इतक्यात त्याला आमची चाहूल लागली. अगदी दोन क्षण त्याने आमच्या कडे "पाहून" घेतले, अंदाज घेतला, अन मग पुन्हा आपल्या खाण्याकडे वळला. मग मात्र आम्ही तिथून निघे पर्यंत काही त्याने आपली खाद्यसमाधी सोडली नाही.



पण मला ते दोन क्षण खुप मोठा आनंद देऊन गेले. तुम्हाला ..... ?

____

## ४. टायगर शो !

तेव्हढ्यात आमच्या गाईडच्या वॉकीटॉकीने बीप केले. टायगर शो अनाउंन्स झाला होता !

जंगलात जाऊनही कधी कधी वाघ दिसत नाही. मग पर्यटक फारच नाराज होतात. त्यावर या अभयारण्यांनी शोधून काढलेला उपाय म्हणजे हा **टायगर शो** ! वाघाने शिकार केली की तो त्या ठिकाणी काही काळ निश्चित थांबणार असतो, किंवा भरपूर खाणे झाल्यावर अंग थंड रहावे या साठी तो पाण्यात जाऊन बसतो. या आणि अशा परिस्थितीत वाघ काही काळ का होईना एका ठिकाणी बराच काळ थांबतो. मग पर्यटकांना हत्ती वरून तेथे नेऊन हा बसलेला वाघ दाखवता येतो. यालाच टायगर शो म्हणतात. या टायगर शो मध्ये वाघ अगदी जवळून बघण्याची संधी मिळते.

जंगलात प्रवेश केल्यानंतर आपल्याला या शोसाठी नाव द्यावे लागते. आमच्या गाईडने हे आधीच केले होते, अन त्या नुसार आमचा नंबर आला होता. म्हणून आम्ही परत

फिरलो अन वाघिणीला बघायला निघालो. जंगलात शिरल्यावर पहिल्याच फेरीत आम्हाला वाघ अगदी जवळून बघायला मिळणार होता. या टायगर शो मध्ये फक्त एकच मायनस बाजू असते ती म्हणजे असा वाघ फारशा हालचाली करत नसतो, तो एकतर झोपलेला असतो, किंवा आपले खाणे खात बसलेला असतो, त्याची हालचाल, त्याची ग्रेस फारशी पहाता येत नाही यात. पण वाघ खुपच जवळून अन स्पष्ट पहाता येत असल्याने या टायगर शोला खुप महत्व असते.

जीपवरून हत्तीवर चढून मग आत जंगलात जायचे असते. स्वाभाविकच हत्ती जंगलातल्या रस्ते नसलेल्या आतल्या भागात जातो, त्यामुळे 'अन-टच्ड' जंगलही आपल्याला बघायला मिळते. पण हे हत्तीवर चढणे जरा जिकीरीचे असते. आधी जीपच्या सीटवर उभे राहायचे. मग सीटच्या पाठीच्यावर पाय देऊन दुसरा पाय जीपच्या चौकटीच्या बारवर ठेऊन हत्तीवर लावलेल्या छोट्या शीडीवर चढून हत्तीवर स्वार व्हायचे. मला लिहायला जेव्हढा वेळ लागला त्याच्या अर्ध्या वेळात हे आरोहण करावे लागते. ही कसरत अवघड खरी पण वाघ बघायचा या उत्साहात करून जातो आपण.

तर आम्ही हत्तीवर बसलो. अन हत्तीने झाडाझुडपातून वाट काढत आगेकुच केले. माहूत झाडांच्या फांद्या बाजूला करत होता अन आम्हाला ही तसे करायला गाईड करत होता. आम्ही उत्सुकतेने इकडे तिकडे बघत होतो

. आमचे नशीब फार जोरावर होते. इतका वेळ एका ठिकाणी बसलेली वाघिण थोडी पुढे निघाली होती. आमच्या



समोर अगदी दहा फुटावर ती आम्हाला पाठमोरी दिसली ती !

माहुताने हत्ती पुढे नेला, तिला आमची चाहूल लागली. तिने मागे वळून पाहिले,



पण आमचे तिच्या मागे येणे तिच्या दृष्टीने फारसे गंभीर नव्हते. ती पुढे चालू लागली. वाघाला जंगलचा राजा का म्हणतात ते आता कळले. काय दमदार पावले टाकत, ती जंगलची अनभिशिक्त राज्ञी चालत होती. आम्ही तिच्या मागे आहोत, नाहीत याची तिला काही फिकीर नव्हती. ना आम्ही तिचे सावज होतो, ना तिला आमच्याशी काही कर्तव्य होते, ना ती आम्हाला घाबरत होती. आम्ही जणू तिच्या दृष्टिने अगदी किडामुंगीच ! मला वाटतं हाच तिचा अ‍ॅप्रोच आम्हाला थक्क करून गेला. ना कोणाची भीती ना कोणाला जवाब देणे, मस्त आपल्याच धुंदीत ती पुढे चालत होती .

१०-१२ फुटावर खाली खड्डा होता. त्यात थोडे पाणी होते. तिथे जाऊन ती बसली. आता ती खाली खड्यात अन आम्ही खड्याच्यावर असे उभे होतो. हत्तीच्या पायाखाली साधारण २-३ फुटावर ती. आमच्या पायाखाली साधारण ८- १० फुटावर ती बसली होती. आमच्या हत्तीने पाय हलवला.

बहुदा खालचे झुडुप थोडे दबले असावे. आम्ही तिच्या डोक्याच्या अगदी जवळ असल्याने तिला थोडे "डिस्टर्ब " झाले. तिने थोडे वर पाहिले. अन मधल्या छोट्या झुडुपातून तिचा मी अगदी क्लोज अप घेतला.

हत्तीने आपला पाय अजून हलवला तशी ती उभी राहिली अन अगदी थोडी गुरगुरली अन तिने आमच्या नजरेला नजर दिली. अगदी "आय टू आय कॉन्टॅक्ट" !



त्याबरोबर हत्तीने स्वतःच पाऊल मागे घेतले. जंगलचा कायदा हातात घ्यायला हत्ती थोडाच माणूस होता? हत्ती आता सुरक्षीत अंतरावर आला. अजून २ मिनिट आम्ही तिला न्याहाळत होतो. पण आता माहुताला घाई झाली, दुसरे पर्यटक त्याची वाट पहात होते. आम्ही परत फिरलो. माहुताला तीन तीनदा धन्यवाद देत आम्ही खाली जीपमध्ये उतरलो. आता जंगलात काही दिसत नव्हतं. तिच्या नजरेने आमचा पूर्ण ताबा घेतला होता. आम्ही परतीच्या वाटेवर लागलो.



# ५. दुसरी संध्याकाळ

बांधवगडच्या जंगलात प्रवेश करताना आधी एक अगदी छोटीशी नदी लागते. छोटी म्हणजे किती छोटी, तर आपण जीपमधून ती पार करतो रस्त्यावरून ती आपली वाहतेय इतकेच. पावसाळ्यात तिला खुप पाणी असतं म्हणे. तिचं नावही काही



तरी फार छान आहे, पण आत्ता आठवत नाही. (सोनानदी?) असं म्हणतात, की जंगला बाहेरची सगळी घाण धुवून मगच ही नदी तुम्हाला आत जंगलात येऊ देते, किती छान कल्पना नाही ?

तर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही जंगलात जायला निघालो. या छोट्या नदी पाशी आलो. अन

शेजारच्या झाडावर हा आमचे स्वागत करायला आलेला. अगदी छोटासा खंड्या ( किंगफिशर ) अगदी त्या छोट्याश्या नदीला शोभेल असा 

अन दुसऱ्या झाडावर हा अगदी झाडाच्या पानाच्या आकारा एवढा चिमुकला पक्षी " टिकल्स ब्लू फ्लाय कॅचर"



बांधवगडचे सौंदर्य म्हणजे तेथली हरणे. अगदी कळपच्या कळप.



संध्याकाळच्या उन्हात गवताच्या रानात ती चमकत होती.

तसेच आम्ही पुढे गेलो. मग थोडी दाट झाडी लागली. पुढे काही जीप्स थांबल्या होत्या. आमचीही जीप थांबली. पुढच्या जीपमध्ये निखिल, माझा लेक होता. त्याने खुणा करून झाडाच्या फांदीवर पंख सुकवत बसलेला गरूड दाखवला.



रिसॉर्टवर परत आल्यावर त्याने आधीची "स्टोरी" सांगितली. तिथे हा गरुड आधीपासून होता. ती त्याची "जहागीर" असावी. तेव्हढ्यात तिथे दुसरा गरुड आला. या गरुडाला ते अजिबात खपले नाही. त्या दोघांची टेरीटरी वरून भांडणं सुरु झाली. जवळ जवळ १५-२० मिनिटं ही जंग चालू होती. अखेर या गरुडाने त्याला हुसकाऊन लावलंच. या

मारामारीचा शीण उतरवायला महाराजांनी शेजारच्या नदीत स्नान केले होते, अन आता मस्त उन्हात आपले पंख वाळवत बसले होते. आमची ही जंग बघण्याची संधी हुकली, पण हा राजस पक्षी असा पंख सुकवत निवांत बसलेला तरी बघायला मिळाला, हे ही नसे थोडके !

संध्याकाळी वेळ फार भरभर जातो. तशात संध्याकाळी जंगलात थांबण्याच्या वेळाही कमी आहेत सकाळच्या तुलनेत. आम्ही पुढे निघालो. थोडं अंधारु लागलं. अन जंगलाचे रुप पालटू लागले. झाडांच्या सावल्या खेळ करू लागल्या. संधीप्रकाशात उगाचच कसलीतरी भीती दाटून आली. कोणत्याही नव्या जागेत उजेड असताना आपल्याला काही वाटत नाही. पण अंधार पडू लागला की त्या जागेचे अनोळखीपण अंगावर यायला लागते. तसेच काहीसे वाटू लागले. आमची जीप आता मध्यात असलेल्या तळयाच्या दिशेने निघाली. शक्यता होती की एखादा वाघ पाणी प्यायला तिथे येईल, किमान काही प्राणी पक्षी दिसतील.

तळया काठी तर जत्राच जमली होती. कारणही तसेच होते. जंगलातली दुसरी वाघिण पाण्यात मस्त पाय सोडून बसली होती. खरं तर ती तळयाच्या त्या बाजूला होती. आमच्यामध्ये बरेच अंतर होते. पण मध्ये कसलाच अडथळा नसल्याने अन सुर्य आमच्या उजव्या बाजुला असल्याने ती छान स्पष्ट दिसत होती.



तळयाच्या उजवी कडे थोडी लांब हरणे चरत होती. मध्यात एका झाडावर काही पक्षी बसले होते. आपापल्या कामांत असले तरी त्यांची नजर मात्र वाघिण काय करते याकडे होती. हे पक्षीही तिच्या कडे पहात होते. सर्वांच्या नजरा दाखवत होत्या वाघिण कोठे बसली आहेते.

थोडावेळ तिने पाण्यात बसून घेतले. वातावरण आता हळूहळू थंडावत होते. म्हणूनच की काय ती आता पाण्यातून उठली. उठून आमच्याकडे पाहत निथळत उभी राहिली.



आता सगळे प्राणी- पक्षी सजग झाले. तेव्हढ्यात आमच्या आवाजाने तिचे आमच्याकडे लक्ष गेले. तिने थोडे गुरकाऊन आमच्या आवाजाबद्द्ल नाराजी दर्शवली. मग तिला आपले अंग सुकवावेसे वाटले, अन शेजारचे गवत तिला उपयोगी वाटले. अन आजपर्यंत अगदी फोटोतही न पाहिलेली पोज तिने दिली. अगदी आपल्यासारखी ती पाठीवर लोळू लागली खरं वाटत नाही ना ? हे घ्या प्रूफ



तिचे पांढरे पोट, भरदार मांड्या, गुबगुबीत पावलं ( सॉरी , जरा जास्तच सेक्सी वर्णन होतंय ) . ती आपली मस्त एका कुशीवरून पाठीवर मग पुन्हा दुसऱ्या कुशीवर अशी लोळत पडली होती. मला तर वाटलं आता ती एक पाय दुसऱ्यावर टाकून निवांत ताणून देणार.

तेव्हढ्यात ती पुन्हा ऊठली. अन आम्हाला समोर ठेऊन पुढे यायला लागली. तिची ही पोज जरी ती तळयाच्या त्या बाजूला असली तरी आम्हाला जरा धोकादायकच वाटली. समोरून चाल करून येणारी वाघिण ! काय चेष्टा आहे का ?



मग आम्ही निघालो. आमच्या जीपमधले काही अजून तिथे थांबू असे म्हणत होते. आमच्या इतर जीप्सही तिला पहात उभ्या होत्या. पण आमच्या गाईडला काय झाले माहिती नाही, त्याने जीप वळवायला सांगितली. आता आम्ही परतीच्या वाटेला लागलो. पुढच्याच वळणावर जीप उजवीकडे वळणार तेव्हढ्यात आमच्या गाईडने डावीकडे हालचाल टिपली. त्याने खुण केली अन चालकाने लगेच अगदी हळू जीप डावीकडे वळवली. अन मग आम्हाला पिवळया गवतात लपत छपत येणारे

एक महाशय दिसले; काळे अस्वल ! ते इकडे तिकडे पहात पहात , अंदाज घेत पाणवठ्याकडे चालले होते.



मुळात अस्वल हा अतिशय लाजाळू प्राणी. त्याला माणसांचे फार वावडे. जरा चाहूल लागली की ते लगेच झाडात दिसेनासे होते.

आमच्या मागे अजून एक जीप आली. अन आम्ही का थांबलोय हे पहायला ती जीप जरा जोरातच आवाज करत आली. त्याबरोब्बर ते अस्वल गोंधळले. अन चटकन मागच्या झाडीत नाहीसे झाले. पण तेव्हढ्यात माझ्या कॅमेराने क्लिक क्लिक केले होते

हे म्हणजे अगदी बोनस होते. कान्हालाही आम्ही अस्वल पाहिले होते, पण अगदी अंधूक प्रकाशात. त्याची फक्त काळी आकृती ( सिल्हाउट) दिसली होती. पण आता जंगलातले

मोकळे अस्वल पूर्ण प्रकाशात दिसले होते. मागच्या जन्मी आम्ही नक्कीच जंगलचे रहिवासी होतो

आता मात्र जंगलातून बाहेत पडायलाच हवे होते. आता इकडे तिकडे न बघता गाईडने जीप पळवायला सांगितली. पण जंगलच्या राजाचे काही समाधान झाले नव्हते. तो आमच्या जायच्या रस्त्यावर आम्हाला टाटा करायला आला.

जंगलातला हा नुकताच स्वतंत्र झालेला छोटा वाघ होता. आमच्या उजवीकडच्या गवतातून स्वारी फिरायला बाहेर पडली होती. आमच्या बरोबरीने तो चालत होता.



अर्थातच आमची अन पुढच्या - मागच्या सर्व जीप्स्ची चाल मंदावली. पुढे हरणांचा कळप निवांत चरत होता. त्यांना या धोक्याची जाणीव झाली नव्हती. एकतर वारा उलट वहात होता, अन गवतात जंगलचा राजा लपून गेला होता.

आता संध्याकाळचे ६.३० वाजले होते. जंगलचे दरवाजे बंद व्हायची वेळ ! आता थांबणे शक्य नव्हते. सगळया जीप्स सुसाट निघाल्या. त्यांच्या आवाजाने हरणां लक्ष आता वाघाच्या बरोबर विरुद्ध बाजूला होते. वाघाला हे सगळे अतिशय अनुकुल होते. त्याने दबा धरला....

त्याचा हा अगदी जाता जाता, चालत्या जीपमधून काढलेला फोटोच सांगेल पुढे काय झालं असेल ते!



___

## ६. कल्लू आणि बल्लू

तिसऱ्या दिवशी पहाटे जंगलातला एकदम उजवीकडचा रूट आम्ही पकडला. गाईडने सांगितले, याच रूटवर तीन वाघांचा इलाखा आहे. बांधवगडचा सध्याचा वयाने, अनुभवाने आणि आकाराने सर्वात मोठ्या वाघाची, B 2 ची ही टेरिटरी !

बांधवगडमधील सध्याची वाघांची वस्ती ज्या दोघांच्यामुळे "वस्ती" झाली, ते म्हणजे; चार्जर हा वाघ अन सीता ही वाघिण. यांचाच हा बी टू मुलगा. डिस्कव्हरीवर सीता अँड हर स्टोरी अशी ३-४ भागांची मालिका लागते कधी कधी. (https://www.youtube.com/watch?v=I2psIR5LnLM ) (https://www.youtube.com/watch?v=RK27C070mMg ) त्यात हा बी टू इतका गोड दिसतो की काही विचारू नका. कधी मिळाली तर चुकवू नका ही मालिका. तर सीता अन चार्जरचा बी टू हा मुलगा. सध्या तोच बांधवगडचा घरप्रमुख ! त्याची मुलं कल्लू आणि बल्लू !

सहसा वाघाची पिल्लं आईच्या छत्राखालून स्वतंत्र झाली की एकएकटे आपला इलाखा तयार करतात. त्यातही दोन नर कधीच एकत्र राहत नाहीत. पण बांधवगडमध्ये हे आश्चर्य घडतेय. तसे दोघेही नुकतेच आईच्या पंखाखालून स्वतंत्र झालेत, पण एकमेकांची सोबत त्यांना अजून सोडवत नाहीये :)

तर आम्ही या तिघांच्या मागावर होतो. आधी बी २ चा इलाखा होता. पण बी२ आता म्हातारा झाल्याने त्याच्या हालचाली आता कमी झाल्या आहेत. त्यामुळे एकदा शिकार केली की बराच वेळ तो एकाच जागी बसून राहतो, त्यामुळे तो दिसणे फारच अवघड होते. आम्ही पुढे पुढे निघालो. आता बी २ चा इलाका संपला.

चालकाने जीप हळू केली. "उजवीकडच्या जाळीमागे एक छोटी टेकडी दिसत होती, तशी बरीच लांब होती अन मध्ये बरीच झाडी अन वाळक्या वेलींची जाळी होती. आम्हाला ती टेकडी कशीबशीच दिसत होती. " उस में एक गुफॉ है जहॉ पर कल्लू- बल्लू रहते है " गाईडने अतिशय आल्हाददायक माहिती पुरवली. " इस टाईमपर निकलते है दोनो | देखते है आज क्या करते है | " जणूकाही तो त्याच्या दोन मित्रांचीच दिनचर्या सांगत होता :)

आम्ही डोळे फाडफाडून पाहू लागलो. पण अं-हं. काहीच हालचाल दिसत नव्हती. आमच्या चालकाने जीप बंद केली, जणू काही कल्लू-बल्लूने त्याला मोबाईलवर मेसेज पाठवला होता, "यहॉ रूको | हम आते है |" पुन्हा एकदा वाट बघणे सुरू झाले.

गाईड एकदम हलला. आमची नजर आपोआप त्याच्या हालचालींचा मागोवा घेत मागच्या बाजूला फिरली. अन जाळीतून तो दिसला ... " ये बल्लू आ रहा है ..."



आमच्या डावी कडच्या जाळीतून बल्लू रस्त्याच्या बाजूला येत होता. गाईडच्या मते आम्हाला " क्रॉसिंग" मिळणार होते. " क्रॉसींग " म्हणजे, वाघाला रस्ता क्रॉस करताना पहायला मिळणे. हे जंगल सफारीत फार फार महत्वाचे असते. एक तर आपल्याला वाघ अतिशय जवळून पहायला मिळतो. अन रस्त्यावर तो येत असल्याने, मध्ये कसलाही अडथळा नसल्याने त्याचे अगदी नीट दर्शन होते, त्याचे फोटो ही यामध्ये छान मिळू शकतात.

बल्लू पुढे पुढे येत होता. आता तो आम्हाला ओलांडून पुढे गेला. ओहोहो तो आता रस्त्याच्या जवळ आला. झाडा-वेलींच्या सावलीतून तो एकदम उन्हात आला. त्याने गपकन डोळे मिटले. अन मी ही एक डोळा मिटला, माझे बोट

मात्र दाबले गेले होते. मला वाघांनी अगदी छान छान पोजेस दिल्या आहे की नाहीत ?

अरे, तो पहा तो रस्त्यावर आला. आमच्या अगदी समोर तो रस्ता " क्रॉस" करत होता.



कोवळ्या उन्हातले त्याचे राजबिंडे रूप डोळयात ठरेना. मागच्या हिरव्या गडद झाडांच्या पार्वभूमीवर उन्हात त्याच्या अंगावरचे चमकणारे पट्टे फारच लुभावणारे होते.आता बल्लू पुढे पुढे अन आम्ही त्याच्या मागे असे साधारण १५-२० फूट गेलो. अतिशय थरारक असा हा अनुभव. चक्क वाघाबरोबर मॉर्निंग वॉक :)

थोडे पुढे गेल्यावर बल्लू डावीकडच्या गवतात शिरला. आता तो आत आत घुसत होता. पिवळ्या गवतात तो

मध्येच दिसत होता, मध्येच लपत होता. साधारण २० फूट आत तो गेला असेल. अन तिथे आम्हाला दुसरी हालचाल दिसली.

" अरे ओ देखो कल्लू ! " आम्ही थक्क होऊन बघू लागलो. बल्लू जेथे पोहचत होता तिथे आधीच कल्लू होता. म्हणजे आम्ही यायच्या थोडावेळ आधी कल्लू याच मार्गावरून गेला होता तर. आता आमच्या समोर दोन दोन राजे उभे होते- कल्लू आणि बल्लू !



कल्लू आमच्याकडे पाहत उभा होता,जणूकाही " मी तुमच्या आधीच आलो " असं म्हणत आम्हाला जीभ दाखवत चिडवत होता. बल्लू तिथे अजून पोहचत होता म्हणून आम्हाला अजून पाठमोरा होता.

पाच सात मिनीटं दोघे आपापसात काही बोलले अन दोघांनी मिळून आगेकूच सुरू केली.

आमच्या डाव्याबाजूने ते आता मागे चालू लागले. जंगलात जीप चालवणाऱ्या चालकांच्या स्किलची आम्हाला प्रचिती आली. चालकाने इतक्या कौशल्याने जीप उलटी वळवली की आम्हाला जाणवलेही नाही. आता ते दोघे आमच्या उजवीकडे होते. आम्हाला वाटलं की आता ते दोघे आत जंगलात जातील. पण आमच्या जीप चालकाने आणि गाईडने सांगितले की नाही ते पुन्हा आपल्या गुहेत जातील. म्हणजे पुन्हा क्रॉसींग ? वॉव ! पुन्हा वाघ रस्त्यावर समोर दिसणार ?

मगाशी आमची जीप पहिली होती पण आता उलटे फिरल्यामुळे आता आमच्या पुढे दोन जीप्स होत्या.



सगळे जण आता घाई करत होते. ते दोघे कोठे क्रॉसींग करतील याचा अंदाज घेत घेत चालक पुढे चालले होते. थोडे पुढे गेल्यावर खरंच त्यांनी आपला मोर्चा रस्त्याच्या दिशेने वळवला. अन पुन्हा तो क्षण आला.

कल्लू पुढे होता. तो भर्रकन पुढे आला अन त्याने झटकन रस्ता क्रॉस केला. पुढच्या जीपने घोटाळा केला. ती आम्हाला अगदीच आडवी आली. अन एक मस्त क्षण हातातून गेला. ॲडजेस्ट करून मी क्लिक करे पर्यंत तो कशाला थांबतोय. मला कल्लूचा चेहरा काही पकडता आला नाही.

तो झाडांतून भराभर दिसेनासा झाला. मी फारच हिरमुसले. मगाशी बल्लू मिळाला पण पाठमोरा. आता कल्लू चेहऱ्याशिवाय :(

तेव्हढ्यात बल्लू पुढे आला. आता मात्र माझा मार्ग खुला होता. थोडी सावली होती पण मला बल्लू नीट मिळाला.

६.४० ते ७.१० केवळ अर्ध्या तासाच्या अंतरात तीन क्रॉसींग्ज आम्हाला मिळाली होती. आमचे नशिब खरच जोरावर होते.

 

वरचे दोन फोटो कोणाला एकाच वाघाचे वाटतील. गाईड, चालक या वाघांना कसे काय वेगवेगळे ओळखू शकतात असाही प्रश्न पडू शकतो. मी याबद्दल थोडी माहिती वाचून काढली, काही डिस्कव्हरीवर मिळाली. ती तुमच्याशी शेअर करते.

सगळया वाघांवर पट्टे असतात. प्रथम दर्शनी ते सगळेच आपल्याला सारखे वाटतात. पण या पट्ट्यांवरून , त्यातल्या फरकांवरून वाघ ओळखता येतात. माझ्याकडे कल्लू आणि बल्लू यांचे वेगवेगळे फोटो मी अभ्यासले. अन आता मलाही नाव न बघताही त्यांच्यातला कल्लू कोण



अन बल्लू कोण हे ओळखता येते.

बघा हं...

कल्लूच्या अंगावरचे, तोंडावरचे पट्टे थोडे फिक्या रंगातले अन थोडे जास्त शार्प आहेत, तर बल्लूच्या अंगा-तोंडवरचे पट्टे थोडे जास्ती डार्क अन जास्ती ठळक आहेत. कल्लूच्या डोळयावर अर्ध गोल अन त्यात मध्यात एक छोटी रेघ दिसतेय. तर बल्लूच्या डाव्या डोळयावर आडवा तीन काढल्या सारखा दिसतोय.

बल्लूच्या डोक्यावरचे पट्टे जास्त ब्रॉड अन डार्क आहेत तर कल्लूचे फिकट आणि शार्प !.

त्यांच्या पोटावरचे पट्टेही असेच वेगळेपण दाखवतात. बल्लूचे थोडे डार्क अन जवळ जवळ, तर कल्लूचे फिके अन थोडे लांब लांब.



# ७. जंगलातला थींकर आणि थरार



कल्लू आणि बल्लू आपल्या गुहेत निघून गेले. त्यांच्या गुहेभोवतालच्या वाळक्या वेली अन झाडांच्या फांद्यांच्या सावल्या यात डोळे फाडफाडून आता काहीच दिसणार नव्हतं. मग आम्ही जंगलातले दुसरे अनुभव घ्यायला निघालो. जंगलातली झाडी मागे पडली. आता आम्ही गवताळ रानात आलो. कान्हामध्ये अशी

गवताळ रानं खुप मोठी आहेत, पण बांधवगडमध्ये एखाद दोनच ठिकाणी अशी गवताळ रानं आहेत. त्यातल्या एका रानात आम्ही होतो.

आत शिरल्याबरोबर आमच्या समोर पिंपळ उभा होता. नुकतीच पालवी आल्याने छोटी छोटी लाल लाल पानांनी सळसळ करत आमचे स्वागत करत होता. त्याची पानं अगदी



तांब्याच्या रंगाची होती. मागे निळे आकाश अन त्यावर हा "तांबूस" पिंपळ ! माझ्या कॅमेराला वाईड लेन्स लावलेली होती. ( म्हणजे लांबचे झूम करण्यासाठी असणारी लेन्स) त्यामुळे इतक्या जवळ असलेला तो सुंदर वृक्ष माझ्या फ्रेममध्ये बसेना. मग फक्त शेंड्याचाच भाग क्लिक केला.

थोडं पुढे गेलो. आमच्या डावीकडच्या गवतात एक टिटवी आपल्या घरट्याजवळ फिरत होती.



ही जमिनीवर राहणारी टिटवी. डोक्यावर काळी टोपी घातल्यासारखी दिसत होती ती ! फिका तपकिरी कोट, आत पांढरा शुभ्र शर्ट अन गळ्या ऐवजी कपाळावर बांधलेला पिवळा टाय अन डोक्यावर हॅट ! जणू काही मॅडम मिटिंगलाच चालल्या होत्या.

पुढे थोड्या अंतरावर उजवीकडे हरणं चरत होती. आमची चाहूल लागल्याबरोबर ती सगळी थोडी आत जंगलात वळली. हरणं अतिशय सजग आणि चपळ असतात. त्यामुळे त्यांचे क्लोज-अप्स मिळणे अवघड असते. तुमची झूम लेन्स अगदी ४००-५०० ची असेल तर शक्य असते. पण माझ्याकडे होती ५५-२५० ची लेन्स. पण बहूदा माझं जंगलप्रेम इथल्या प्राण्यांना कळलं असाव.



सगळा कळप जरी आत गेला तरी हे हरीण आमच्या खुप जवळ थांबून राहिलं होतं, इतकंच नाही तर मस्त स्माईल देत थांबलं होतं. जंगलातले हे असे क्षण आपल्याला हळवं करून जातात. आपल्यावर त्यांनी टाकलेला हा विश्वास आपल्याला हलवून टाकतो. मी

दोन क्षण तशीच थबकले. गाईडने हळून भान दिले, "दिदी, स्नॅप लेलो ना " मी भानावर आले. पण एकदम हालचाल करणे योग्य नव्हते. अगदी हळू, मोठी हालचाल न करता कॅमेरा त्याच्याकडे वळवला अन हा स्नॅप मला मिळाला. थॅंक्स टू गाईड :)

पुढे गेलो तर जंगलातला आणखीन एक महत्वाचा प्राणी दिसला. एरवी आपण " ई ssss डुक्कर " असं म्हणत असलो तरी जंगलच्या जैवसाखळीतला हा एक महत्वाचा प्राणी. अन हे जंगली सुव्वर दिसतही होते रेखीव अन जरा भीतीदायकही. नीट पाहिलत तर त्याचा चमकणारा गोल आकाराचा सुळाही दिसेल तुम्हाला.



आता सकाळची वेळ संपत आली होती. आम्ही परतीच्या वाटेवर निघालो. झाडांच्या सावल्यात अन उन्हाच्या कवडशात माकडांची कुटुंबे रस्त्यावर फिरत होती. त्यामानाने

वाघानंतर माणसांना पाहून पळून न जाणारे कोणते प्राणी असतील तर ते म्हणजे आपले पूर्वजच ! आमच्या येणाऱ्या गाड्या पाहूनही ती मंडळी आपला रस्तावरचा मुक्काम हलवायला तयार नव्हती. मग काय आम्ही त्यांचा दिनक्रम बघत बसलो. काही मोठी माकड आपापल्या शक्तीचा अंदाज घेत होती. काही झाडांवर सूरपारंब्या खेळत होती. त्यातल्या एका कुटुंब प्रमुखाची आमच्यावर अशी नजर होती.



तेव्हढ्यात माझे लक्ष गेले. एका आईच्या कुशीत हा आपला खरा पूर्वज बसला होता. त्याची पोज मला ऑगस्ट रॉडिनच्या 'थींकर"चीच आठवण देऊन गेली. गंमत म्हणजे



बऱ्याचजणांना हा दिसलाच नव्हता. कारण रिसॉर्ट्वर परत आल्यावर एकमेकांचे फोटो पाहताना हा फोटो पाहून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं. त्यांनी पाहिलाच नव्हता तो ! त्याची ती गोड पोज मला फारच भावली.

स काळची ही ट्रिप अशी मस्त झाली होती. दुपारी आम्ही निघालो तेव्हा आता काय काय बघायला मिळणार असं म्हणत आम्ही निघालो. कारण आज आम्ही बांधवगडच्या शेषशाही विष्णूला पहायला जाणार होतो. डोंगरावरच्या घाटाच्या, मातीच्या चिंचोळया रस्त्याने धाडधाड जीप्स चालवत आम्हाला चालकाने वरती आणले. २-४ दा तर अगदी धस्स झालं. त्यांचे स्किल खरच वाखाणण्यासारखे आहे.

वरती पोहचलो. वरही भरपूर झाडी होती अन त्यातच विष्णूची भलीमोठी मूर्ती, जवळ जवळ २५ - ३० फूटतरी असावी , आराम करत पहुडली होती.





तिथे मला एक अगदी छोटा गॉगलवाला दिसला. सहा पायाचे एक महाराज अगदी रेबनचा गॉगल घालून बसले होते.

तिथून आम्ही पुन्हा खाली जंगलात आलो. आता आम्ही एका गुहे पाशी थांबलो. भर जंगलात एका टेकडीच्या पायथ्याशी ही गुहा होती. खडकात खोदून तयार केलेली असल्याने मध्ये गुहा अन तिच्या डावी, उजवी कडे उतरत येणारी टेकडी अशी काहीशी रचना होती. गुहेला लोखंडी जाळीचे दारही होते. ( हे इतक्या तपशीलाने सांगतेय त्याचे कारण पुढच्या गोष्टींमधला थरार लक्षात यावा म्हणून !)

ही गुहा तिथल्या वटवाघळांसाठी प्रसिद्ध आहे. छोटी छोटी हजारों वटवाघळं इथे वस्तीला आहेत. आम्ही आत गेलो. आतमध्ये एक मोठी गुहा अन त्याच्या आत अजून छोट्या खोल्या होत्या. आमच्या गाईडने आम्हाला आतल्या छोट्या खोलीवजा गुहेत नेले. अंधाराशिवाय काहीच दिसत नव्हतं.

मग आमच्या गाईडने काडी उजळली. तरी काही दिसलं नाही अन तेव्हढ्यात उजेडामुळे काही वटवाघळं उडायला लागली. ईsssss असा आवाज करत बहुतांशी लोक मागे सरले. आख्ख्या गुहेत छताला वटवाघळं चिकटली होती. आजपर्यंत



इतकी वटवाघळं मी बघितली तर जाऊच दे पण इमॅजिनही केली

नव्हती. अगदी जीवावर उदार होऊन कसं तरी क्लिक केलं अन बाहेरच्या गुहेत आले. त्यामुळे फोटोही त्या खोलीच्या फक्त बाहेरच्या बाजूचा आलाय. पण उजवी कडे आत आत किती वटवाघळं असतील याचा अंदाज नक्की येईल तुम्हाला. तो फोटो पाहून जे "याssssक" असं म्हणणार नाहीत, त्यांना माझ्याकडून एक जेवण लागू.

मग आमच्या गाईडला अजूनच स्फुरण चढले. त्याने एका वटवाघळाला पकडून आमच्या समोर आणले. इतके छोटे होते ते, अन खरं सांगायचं तर मला ते दिसूनही आवडले.



तुम्ही हसाल पण मला ते गोंडूस दिसले, आजही तसेच वाटते.

मग आम्ही गुहेच्या बाहेर आलो. जंगलात असे जमिनीवर आम्ही पहिल्यांदाच आहोत याची जाणीव झाली. खुप छान वाटलं. आतापर्यंत आमच्या गाईड, चालकाची सक्त ताकिद असायची " कोणीही जंगलात प्रवेश केल्यावर जीपमधून खाली उतरायचे नाही " अन हा नियम ते स्वतःही पाळत. (अपवाद फक्त आत जिथे चहा-पाण्याची सोय केली आहे ते चेक पॉईंट ) आता पहिल्यांदा असे झाले होते की आम्ही जंगलात पाय उतार होतो. हे लक्षात आले अन अंगावर सरसरून काटा आला. म्हटलं तर आपण आणि जंगलचा राजा आता एकाच पातळीवर आहोत !

आम्ही इकडे तिकडे पाहू लागलो, आमची जीप गायब होती. त्या वेळेस आमच्या दोन जीप्स तेथे आल्या होत्या पैकी आमची जीप अन चालक गायब होते. आम्ही टेन्स झालो. मग कळले की आमच्यातल्या एकाला बरे वाटत नसल्याने त्याला रिसॉर्टवर सोडायला जीप परत गेलेय. मग आम्ही सगळे निवांत झालो. आम्ही मोठे ४-५ जण, दुसऱ्या जीपचा चालक, दोन्ही गाईड, अन ४-५ मुलं असे टेकडीच्या उजवी कडच्या उतारावर जरा निवांत बसलो.

मुलांना कंटाळा यायला लागला. त्यांचा कंटाळा घालवावा, म्हणून मग आमच्या फोलिएजच्या मार्गदर्शकाने जंगलच्या काही गोष्टी सांगायला सुरवात केली. दोन वाघांच्या मारामारीच्या कथा, पाहलेल्या शिकारीच्या कथा, या आणि अशा अनेक. मग दुसऱ्या जीपच्या चालकाला सुरसुरी आली त्याने तिथल्या कथा सांगायला सुरवात केली.

" *पूर्वी इथे म्हणे काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या कामाचे पैसे देण्याचे काम चाले. एकदा असेच काम चालू होते. मुकादम गुहेच्या उजवी कडच्या उतारावर बसून, एकेकाला बोलवून पैसे देत होता. त्याची डोंगराकडे पाठ होती. अचानक डोंगरावरून वाघिण खाली उतरली. मुकादमासमोर असलेल्या मजूरांना ती दिसली. ते धावत गुहेत पळाले. त्यांनी मुकादमाला ओरडून पळायला सांगितले. पण त्याची पाठ होती. त्याला कळलेच नाही ते का ओरडताहेत ते. वाघिण डोंगर उतारावरून खाली आली अन मुकादमावर तिने हल्ला चढवला. त्याचा हात उपटून काढला. सगळ्या मजूरांनी लोखंडी दार बंद करून घेतले होते. त्यामुळे ते बचावले. वाघिण नरभक्षक नव्हती. पण तिच्या*

*वाटेत मुकादम आल्याने तिने हल्ला केला होता. बराच वेळ तिथे थांबून मग ती निघून गेली. अंदाज घेऊन मजूर बाहेर आले, त्यांनी मुकादमाला दवाखान्यात नेले. पण अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे तो मेला."*

बापरे! हे सर्व ऐकतानाही आमचा थरकाप उडाला. सगळे डोंगर उताराकडे जरा साशंकतेनेच पाहू लागले. आता त्या लोखंडी दाराचा आम्हाला आधार वाटू लागला. त्या गोष्टीतले खरे खोटे तो चालकच जाणे, आम्ही त्याची शहानिशा करायच्याही भानगडीतही पडलो नाही.

नुसत्या कल्पनेनेही आम्हाला जंगलाची ही दुसरी बाजू थरकवून गेली. प्रत्यक्षात काहीही वावगे न घडूनही आम्ही सगळे अतिशय टेन्स झालो. **जंगलाला कॅज्युअली घ्यायचे नाही** हे अगदी मनात ठसले.

संध्याकाळच्या उतरत्या सावल्या आता मनावर ओथंबून येऊ लागल्या.

आमच्या जीपने उडवलेला धुरळा दिसू लागला. पण आमच्या मनावरचे मळभ मात्र तसेच राहिले. परतीच्या वाटेवरही फारसे कोणी बोलले नाही.

—

## ८. "बी टू" ला शेवटचा मुजरा

आज आमचा बांधवगडचा शेवटचा दिवस होता. खरं तर आमची आखलेली ट्रीप आज सकाळीच संपली होती. पण अजून जंगलाची भूल उतरत नव्हती. तशात बांधवगडच्या "राजा"ला अजून आम्ही सलाम करू शकलो नव्हतो. त्यामुळे एक जास्तीची जंगल सफारी करावी असं आमच्यातल्या अनेकांना वाटत होतं. मग आम्ही अनेकांनी जास्तीच्या जंगल फेरीची चौकशी केली, अन आमच्या फोलियाजच्या लिडरने हवी ती सर्व सोय करून दिली, अन मग आम्ही पुन्हा जंगलात निघालो. आज आमच्या दोन जीप्स होत्या. अन आम्ही सर्वांनी ठरवलं होतं की आज फक्त आणि फक्त बी टू लाच भेटायचं. दुसरे सगळे रूट्स बाजूला करून आम्ही बी टू च्या रस्त्यावर आलो. बी टू चा एरिया तसा मोठा, जंगलचा राजाच तो ! पण तरीही गाईडवरती सर्व हवाला टाकून आम्ही निर्धास्त होतो. आज कितीही वेळ एका ठिकाणी थांबायला आम्ही तयार होतो, बी टू च्या दर्शनासाठी.

चार वाजले, आम्ही जंगलात प्रवेश केला. पंधरा मिनिटात एका छोट्याश्या टेकडीला वळसा घालून आम्ही पुढे आलो. अन मग एका ठिकाणी गाईडने "ठहरो" असा इशारा दिला ड्रायव्हरला, अन आमची जीप थांबली. (वेळ : ४.१५ )

समोर एक गवताळ रान होतं अन थोड्या दूरवर छोटा हिरवा पॅच होता. ४-५ हिरव्या पण खुरट्या उंचीच्या झाडांनी घट्ट रान केलं होतं.

आमच्या गाईडने सांगितलं की तिथे पाण्याचा एक स्त्रोत आहे. त्यामुळेच बाकीचे रान पिवळया गवतात असले तरी तेव्हढाच पॅच हिरवा गार होता. दुपारच्या कडक उन्हापासून सुटका मिळवण्याचे अत्यंत रमणीय ठिकाण होते ते. पण तिथे होती प्रचंड शांतता. नव्हता कोणता कॉल, नव्हता माकडांचा आवाज ना हरणांचा आवाज ना मोराचा ओरडा... आम्ही मनातून जरा साशंकच होतो, पण जोडीने गाईडवरचा विश्वासही होता. मग आमची जीप तिथेच दहा मिनिटं थांबली. पण गाईडचे समाधान होईना, त्याने जीप पुढे घ्यायला सांगितली. आता डावीकडे तो स्पॉट ठेऊन आम्ही पुढे झालो. त्या स्पॉटला वळसा घालून बरोब्बर पलिकडे गेलो. पण तिथूनही काही दिसेना. जिथे पाणी होतं तो भाग जरा खोलगड होता, तशात छोट्या झाडांनी जणूकाही तिथे निसर्गनिर्मित गुहाच झाली होती.

आमच्या डाव्या बाजूला ही जागा होती. आमच्या समोर काही हरणं चरत होती. अतिशय निर्धास्तपणे.

जंगलही शांत निवांत होतं. आमचा उत्साह आता मावळू लागला. बहुदा बी टू काही आज दिसत नाही असे वाटू लागले. गाईडने पुन्हा दुर्बिणीतून पाहणी केली, आम्ही पण आमच्या दुर्बिणी, कॅमेरे रोखले, पण हाय... शांतता, शांतता, अन शांतता....!(वेळ ४.३०)

अचानक हरणातल्या एकाने आपली शेपूट उंच केली, सगळी हरणं सावध झाली, अन खरी शांतता म्हणजे काय हे आम्ही अनुभवलं. अगदी चिटपाखरूही हलेना... संपूर्ण जंगल अगदी स्तब्ध, आमचा श्वासही थांबला एक क्षण... पण लगेच पुन्हा वातावरण निवळले. आमचा गाईड मात्र आता सक्रिय झाला. त्याने जीप वळवून पुन्हा मागे घायला लावली. आणि आता तो अतिशयच कॉन्फिडन्ट होता. पुन्हा मगाचच्याच स्पॉटच्या थोडं अलिकडे आणून त्याने जीप बंद करायला सांगितली. (वेळ ४.३५)

आमच्याकडे वळून बघत सांगितलं, " यहींच है वो! मगर कब निकलेगा, निकलेगा या नही कुछ कहा नहीं जाता ! अगर आप ठहरना चाहते हो तो ठहरेंगे या दुसरी जगह कोई दुसरे बाघ का चान्स लेंगे ! आप जैसा कहेंगे, वैसा करेंगे ! " पण आता आम्हाला फक्त बी टू चीच आस लागली होती. "तो" नुसता तिथे आहे याचाही खुप भरवसा वाटत होता तो फक्त तिथे आहे ही जाणीवही आम्हाला पुरेशी होती. आणि आम्ही सगळेच अगदी निवांत अगदी कितीही वेळ थांबायला तयार होतो.

अर्धा तास होत आला. आमच्या दोन जिप्स आणि काही चरणारी हरणं, जंगलाची निवांतता अन त्याच्या असण्याची खात्री यांच्यासह तो अर्धा तास कसा गेला हे कळलेच नाही. एक खुप खुप छान संधाकाळ आम्ही निसर्गासह अनुभवत होतो. खरं तर आमच्या बरोबर लहान चवथी- पाचवीतली मुलं पण होती, पण सगळे एकदम शांत बसून होतो. २-४ इतर जीप्स आम्हाला असं निवांत बसलेलं बघून थांबत होत्या, विचारणा करून आमच्याकडे पहात पुढे मार्गस्थ होत होत्या.

अन मग तो क्षण आला, एका सांबराने खॅक केलं... जंगल हलू लागलं. आमच्या समोरच्या झाडीतून उजवी कडे हालचाल जाणवू लागली. उन्ह उतरू लागली होती, झाडांच्या पानांच्या सावल्या आम्हाला फसवू लागल्या. " तो पहा तिथे"... " नाही या इथे..." सगळे सजग झाले. अन मग तो पुढे आला. (वेळ ५.०१)

गर्द हिरव्या झाडीतून अवाढव्य बी टू दिसू लागला. थोडं पुढे होऊन संध्याकाळचे ऊन अंगावर घेत आमच्याकडे पाठ करून बसून राहिला. त्याचे जेमतेम डोकेच दिसत होते, ते ही मागून. पण त्याच्या कानांवरचे ते प्रसिद्ध ठिपके स्पष्ट दिसत होते.



मध्येच त्याने मान हलवली अन मिळाला एक साईड स्नॅप. अन मग मध्येच तो झोपत होता, मध्येच मान वर करत होता. जवळ जवळ ४५ मिनिटं तो तिथेच बसला होता. आम्ही दुर्बिणीतून अन कॅमेरतून त्याला मनसोक्त पहात होतो. अन मग तो अचानक उठला... आमच्या आशा जागृत झाल्या... पण कसचे काय तो बाहेर यायच्या ऐवजी पुन्हा झाडीत जाऊन बसला. ( वेळ ५.४५)

पुन्हा १५ मिनिटं गेली. आता अंधारू लागलं होतं. जंगल साडे सहा वाजता बंद होणार होतं, कमीतकमी आम्हाला या स्पॉटपासून ६-१५ ला निघावंच लागणार होतं. आमचा जीव आता मेटाकुटीला आला होता. भेटला भेटला म्हणे पर्यंत हातातून क्षण निसटणार असे वाटू लागले. आता पुढची काहीच मिनिटंच हातात होती.

सहा वाजले, आम्ही आता आशा सोडायची ठरवली. मनात म्हटले बघू त्याच्या मनात असेल तसे! आम्ही निसर्गाला शरण गेलो. अन तो क्षण आला ! आम्हाला पार पार बदलवून गेला.

६.०१ तो झाडीच्या डावीकडून बाहेर पडला,



डौलात आमच्या उजवी कडून चालत बाहेर आला .

चिखलात बसल्याने बराच मळला होता, वयाने मोठा असल्याने अन उन्हाळयामुळे त्याचा रंगही फारसा आकर्षक दिसत नव्हता, पण त्याचा आकार, चालण्यातला त्याचा रुबाब, भरदार पावलं,त्याची जंगलावरची कमांड सगळे जिथल्या तिथे होते. आम्ही अगदी नजरबंद झालो होतो. इतकेच नव्हे आमच्या जीप चालकांनाही जीप्स सुरू करायचे क्षणभर लक्षात आले नाही. तो आमच्या समोरून पुढे निघाला. अन मग त्याच्या मागे मागे आम्ही.



आता मी कॅमेरा बंद करून हँडीकॅम हातात घेतला, त्याची प्रत्येक हालचाल टिपायचा प्रयत्न करू लागले. पण हे काम अजिबात सोपे नव्हते. खडबडीत जंगलातला मातीचा

रस्ता, त्याला गाठायसाठी जीपचा असलेला वेग, जीपमधल्या प्रत्येकाची हालचाल या सगळयात हँडीकॅम स्थिर होत नव्हता, पण तसाच रोल करत गेले. आम्ही आता टेकडीपाशी आलो. आता त्याला आपल्या घराकडे जाण्यासाठी टेकडी ओलांडून आमच्या समोरून रस्त्यावर येणे भाग होते.

आता तो आमच्या अगदी जवळ येणार होता. तो एका झटक्यात ती टेकडी चढून आमच्या डोक्यावर आला अन उडी मारून आमच्या समोर खाली रस्त्यावर आला. अन मी हँडीकॅम गळयात सोडून पटकन कॅमेरा हातात घेतला.



पुढच्याच क्षणाला झाडांतून बाहेर येत एक क्षण त्याने आमच्याकडे दृष्टी टाकली, अन मिळाला हा त्याचा क्लोज अप. खोटं वाटेल पण शब्दशः खरे "ताटा एव्हढे मोठे तोंड!"

आता तो डावी कडच्या झाडीत निघाला. आमच्या जीप्सनी डावीकडचा रस्ता पकडला, पण तो जंगलातून पटकन वळून आत गेला.

जीपचालकाने पुन्हा जीप पळवली, आमचा पाठलाग सुरू झाला. पण आता जंगल चांगलच अंधारू लागलं. कॅमेरातली सेटींग्ज बदलायला वेळ नव्हता. मी पुन्हा हँडीकॅम हातात घेतला. रस्त्याने पुन्हा दिशा बदलली अन पुन्हा दूर झाडांत तो दिसला. समोरून पुन्हा त्याचे दर्शन झाले. आता तो त्याच्या आवडत्या जागी बसला. आता तो तिथून रात्र झाल्याशिवाय उठण्याची शक्यता नव्हती. अन जंगल बंद



होण्याची वेळही होत आली होती. (वेळ ६.०८) आम्ही तिथूनच त्याला शेवटचा... हो आता शेवटचाच म्हणायला हवं, सलाम केला. बांधवगडच्या राजाला माझा हा मानाचा मुजरा !

■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■■

# ई साहित्य प्रतिष्ठान

कधी संपूच नये अशी एखादी ट्रिप संपली की जे फ़ीलींग येतं तेच फ़िलींग असं एखादं सुंदर पुस्तक संपताना तुम्हाला येतं का? तर मग तुम्ही आमच्या चोखंदळ वाचकांच्या यादीत असायला हवं. तुम्ही लगेच हे पुस्तक कसं वाटलं, यात अजून काय हवं होतं, हे अधिक चांगलं कसं होईल, असं सगळं आम्हाला कळवायला हवं. वाचकांना काय आवडतं आणि काय नाही हे लेखकांना आणि प्रकाशकांना कळायला हवं ना? तरच साहित्याचा दर्जा वर वर जात राहील. प्लीज या पुस्तकाबद्दलचा आपला अभिप्राय arati.aval@gmail.com किंवा esahity@gmail.com वर कळवा. आपल्या प्रतिक्रियांवरूनच पुढल्या पुस्तकांची आखणी सुरू होईल. आपल्या प्रतिक्रिया लवकर येऊ द्यात. फ़ेसबुकवर esahity च्या पेजवर किंवा प्रोफ़ाईलवरही आपण आपल्या प्रतिक्रिया नोंदवू शकता.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठीमध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. हिंमते मर्दा. मददे खुदा. किंवा हल्लीच्या भाषेत सांगायचं तर सच्ची लगन हो तो अपने सपने हासिल करनेके लिये सारी कायनात एक

हो जाती है. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. या आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. आजचे हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला ते जाणवेलच.

पण आम्ही समाधानी नाही. बारा कोटींच्या या मराठी समाजात किमान एक दोन कोटी तरी समंजस, चोखंदळ वाचक असायला हवेत. ज्ञानोबा तुकोबांच्या संस्कारांत वाढलेल्या या समाजाकडून एवढी अपेक्षा ठेवायला काय हरकत आहे? मित्रहो. ज्योतीने ज्योत तेवत जावी. तसे वाचकांनीच वाचक जोडायला हवेत. तुम्हाला जर हे स्वप्न पूर्ण होण्यात हातभार लावावासा वाटत असेल तर फ़क्त एवढेच करा. आपल्या ओळखीपाळखीतल्या किमान दहावीस लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही VIP वाचक दर्जा देतो.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

अधिक माहितीसाठी भेट द्या : www.esahity.com

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान